# इंदिरा संतांच्या कवितेतील भावधारा

• सोमनाथ कोमरपंत

ख्यातनाम कवयित्री इंदिरा संत या पन्नास वर्षांहून अधिक काळ काव्यलेखन करीत आहेत. आपल्या पृथगात्म कवितेमुळे मराठी काव्यविश्वात त्यानी आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन!

मराठी काव्यसृष्टीत इंदिरा संतांची कविता विशुध्द भावकविता म्हणून ओळखली जाते. ही आत्मनिष्ठ कविता आहे. कवयित्रीच्या भावजाणिवेच्या प्रवासाच्या पाऊलखुणा त्यांच्या 'सहवास' पासून अलीकडच्या 'गर्भरेशीम' पर्यंतच्या काव्यसंग्रहातील कवितांतून दृग्गोचर होतात. कविता हा त्यांचा श्वासनिःश्वास असावा इतक्या सहजतेने ही कविता उमललेली आहे. अंतर्विश्वातील भावतरंगांची संवेदनशील मनाने रेखाटलेली ही नितांत रमणीय चित्रे आहेत. प्रीती, दुःख आणि निसर्ग यांना केंद्रस्थानी कल्पून त्यानी आपले भावविश्व रंगविले आहे. सामाजिक गुंतागुंतीपासून हे कवीमन अलिप्त आहे. ते अभिरूचिसंपन्न आहे. मनस्वी आहे. या मनाने जीवनातील दाहकता शोषून घेतलेली आहे.

इंदिरा संतांच्या कवितेची वीण सूक्ष्म आहेत. त्यांच्या कवितेतील अंतरंग जीवनाच्या आर्त कोमल जाणिवेने भारलेले आहेत. तीत गतकाळाच्या स्मृती आहेत. काळाची जाणीव त्याना प्रत्येक क्षणी निराळ्या तऱ्हेने प्रतीत होते. स्पर्श - रूप - रस गंधादि संवेदना जागविण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिमासृष्टीत आहे. त्यांच्या निसर्गप्रतिमा त्यांच्या अनुभूतीचा अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. कवीच्या अनुभूतिनिष्ठेविषयी इंदिराबाई म्हणतात,

''जागरूकपणे कविता लिहीत असता कवी निर्लेपणानं बाह्य उपाधींना, संकेतांना विसरून मनातील इतर भावभावनांना, विचारांना दूर सारून त्या अनुभूतीलाच जितका चिकटून राहील तितकी ती अनुभूती विशुध्द स्वरूपात प्रतिमांतून प्रकट होईल''.

(शेला/प्रस्तावना/पृ. १२)

इंदिराबाईंच्या प्रतिमासृष्टीला लागू पडणारे हे विधान आहे.

१९४० मध्ये ना.मा. संत आणि इंदिरा संत यांचा 'सहवास' हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला. 'सहवास' मधील इंदिराबाईंची कविता आणि नंतरची त्यांची कविता यात मूलभूत फरक जाणवतो. 'सहवास' मधील कविता सहवासोत्तर प्रीतिभावनेची आहे. नंतरची कविता विरहजन्य अनुभूतीमुळे आर्त भावना प्रकट करणारी आहे. येथे दुःखाला गहिरेपणा आलेला आहे. वेदना सूक्ष्म पातळीवर जाऊन त्यानी रंगविली आहे.

इंदिरा संतांच्या 'सहवास' मधील प्रेमकवितेला आत्मप्रत्ययाचा स्पर्श आहे. शृंगारभावनेपेक्षा नवथर प्रीतीचा हळुवारपणा आणि संयत सूर या कवितेला लाभलेला आहे. ऊन, पाऊस, चांदणे, दुपार, सागर, नक्षत्रफुले या प्रतिमांतून त्या भावस्थितीची चित्रे रंगवितात. मनाची कातर अवस्था पुढील शब्दात व्यक्त होते.

..... सोसाट्याचा येई वारा
ज्योत कापे थरथरा
करूं काय जाऊं कोठे?
('दीप'/सहवास)

पीतिसुगंधाची लहर प्रेयसीला:

सुगंधित येई वारा
किती तरी चेतोहारी
आणि विरे कोठे तरी
('सहवास'/सहवास)

या स्पर्शसंवेदनेतून जाणवते. प्रियकराचा सहवास त्याच्या प्रिय सखीला कसा जाणवतो याचे मनोहारी चित्र स्पर्श व रूप संवेदनांद्वारे रेखाटले आहे.

.... तुझा सहवास
जसा पहाटेचा वारा
फुले फूल झरझरा.
तुझा सहवास
झिरी झिरी चांदण्याचा
मधुरसा उन्मादाचा
('तुझा सहवास'/सहवास)

प्रियकराच्या पत्रामुळे तनु कशी पुलकित झाली आणि आंतरिक वृत्ती कशी फुलून आल्या त्या क्षणाचे चित्रण करताना कवयित्री उद्‌गारते,

थरकल्या नसांतुनि नाजुकशा भावना
उसळल्या मनातुनी रम्य अशा कल्पना
मिटुनि लोचने, हृदयाशी तें धरिलें आनंदुन
सुखद अन् मादक किती तो क्षण!
('तुझे पत्र'/सहवास)

इंदिरा संतांची कविता त्यांच्या भावजीवनावर झालेल्या आघातामुळे पुढे बदललेली दिसते. पतीनिधनाचे दुःख त्यानी अनेक प्रतिमांतून व्यक्त केलेले आहे. उदा.

तुजवीण आता तुझ्या या संसारी
अंगाराच्या सरी वर्षतात:
आंतबाहेरून लागलीसे आग;
तुझा घेत माग येऊ कोठे?
('कातरवेळेला'/शेला)

'आंतबाहेरून लागलीसे आग' या ओळीतून दुःखाच्या ज्वालांची तीव्रता सहजतेने व्यक्त होते. कधीकधी कवयित्रीचा लिहीत असताना हात अडखळतो. अक्षरात डोळे निरखून पाहतात. प्रियकराच्या अक्षराचे तिला स्मरण होते. ती उद्‌गारते :

.... नव्हेतच अक्षरें ही:
स्मृतिसुमनांचे झेले;
एका एका अक्षरांत
भावगंध दरवळे.
('अडखळे'/शेला)

.... म्हणूनच तिचा हात लिहिताना अवचित थांबतो.... डोळ्यात आसवांचे धुके उभे राहते. मनातील भावभावनांचा कोलाहल कवयित्रीला कित्येकदा असह्य होतो. त्या अवस्थेचे चित्र रेखाटताना ती म्हणते :

.... अन् स्वप्नांतून हे दचकून उठते चित्र:
तें स्वप्नच का हें स्वप्न पडावी प्रांत.
नभ अवघें गेले मेघांनी व्यापून;
चारीहि दिशांनी आलें अंधारून
('झंझावात'/शेला)

जन्माचा हा कारावास कधी संपेल हे तिला कळत नाही. श्रांत मिटलेल्या डोळ्यांना दिवस - रात्र देखील उमगत नाही. क्लान्त मनाने वावरताना भावतरंग उमटतात:

.... उभा रक्ताचा पहारा :
कुठे फुटेल पहाट,
कुठे दयाने भिजेल
पापणीचा कृष्णकाठ
आज अखंड मी जागी
रात्र धरून डोळ्यात
('साक्ष'/रंगबावरी)

यातील 'पापणीचा कृष्णकाठ' या प्रतिमेत साकळलेल्या दुःखजाणिवेला नेमका उद्‌गार लाभलेला आहे.

इंदिराबाईंच्या कवितेला संवादी लय प्राप्त झालेली आहे. त्यांच्या कवितेतील प्रेयसी प्रियकराच्या आठवणींवर जगते. आठवणींचा डोह एकाएकी डुचमळला जातो अन् हे मन अस्वस्थचित्त होते.

.... कसा कुणी एकाएकी
खडा फेकला तळ्यात
उमटल्या वलयानी
वेडा केला उभा काठ
('तळ्या'/मेंदी)

प्रियकराच्या जाण्याने प्रेयसीच्या अस्तित्वाचा आसच ढासळलेला आहे. तरीही त्याच्याशी तदात्म झालेले दुःखी मन उद्‌गारते :

निखळे कधि अश्रु एक
ज्यांत तुझें बिंब दिसे;
निखळे निःश्वास एक,
ज्यांत तुझी याद असे
('व्रत'/मेंदी)

कधीकधी कोठेतरी अवचित प्रियकराचे डोळे तिला भेटतात. वीजलोळ कोसळून हृदयाचा तोल जातो.... त्याच्या आठवणींची फुले ती वेड्याप्रमाणे वेचते अन् ती अंगाराच्या उरात ती साठविते. त्याची आच लागून ही फुले नवे रूप धारण करतात. त्याना पाहून आसवे हसतात...

प्रियकराच्या हालचालीने तिचा पारिजात हलतो. अन् मोतीपोवळ्यांची रास पायाखाली ओसंडते.... त्याला उद्देशून ती म्हणते :

तू दूर; परी रे, तुझिया निःश्वसितांनी
ही फुलून गेली अवघी रोमांचांनी
थरथरे तनूमन गोड भाव उसळून
अन् वाट पाहते होऊनिया बेभान।
('सागरा'/शेला)

'दुःख तुझें' (मेंदी) ही कविताही आर्त भावनेने व्यापलेली आहे. मनाची विमुक्तावस्था :

.... मी सुटलें, मी सुटलें
मी हसलें, मी खुललें,
जीवाचें गगनांगण
चांदण्यात तितळ निळे

अशा ओळींतून रंगविता रंगविता कवयित्री अंतर्यामी पाझरणाऱ्या दुःखाचा शोध नेणिवेच्या पातळीवर घेऊ पाहते :

... पण कसला डाग इथे :
जखमेंतिल रक्तच तें
करून जरी नितळ निळें
आंतुन का भळभळतें.

आत्मनिष्ठ भावनेने रंगविलेले कोरीव शब्दशिल्प इंदिरा संतांच्या कवितेत आढळते. नेमकेपणाने आणि नीटसपणे त्या 'स्व' चा शोध घेतात.

धगधगतें जीवन हें
धरून असें ओंजळींत
आलें मी कुठून कशी....
.... आलें मी हेंच फक्त
('आलें मी'/मेंदी)

प्रियकराला विसरण्यासाठी प्रयसा पट-सोंगट्या खेळते. आकांताने दान घेताना पटालाही घेरी येते... त्याला उद्देशून ती म्हणते :

एक एक भूक माझी
तुझ्या मूक आवडीची
तहान ही एक एक
एका अश्रूच्या थुक्याची
('ओंजळ'/मृगजळ)

'घातली ना कानामध्ये' (रंगबावरी) या कवितेत प्रियकराशी संवाद करताना ती उद्‌गारते : तुझी काळी प्रश्नचिन्हे मी कानामध्ये घातली ना? तुझी रक्तवेडी स्वप्ने मी केसामध्ये खोवली ना? तेव्हा नागमोडी पापण्यांनी वीज पेलली ना अन् हासूभरल्या ओठांनी प्रलय झेलला ना?

या साऱ्या संचितामुळे तिला जीवनातील दुःखक्लेश सहन करण्याचे भावबळ प्राप्त झाले आहे.

... त्याच अथांग शक्तीने
आता ग्रीष्माचे स्वागत :
मौनमत्त अंगाराचे
तुरे माळून केसात।
('घातली ना कानामध्ये'/रंगबावरी)

यातील 'ग्रीष्म' आणि 'मौनमत्त अंगाराचे तुरे' या प्रतीक अन् प्रतिमा आशयघन आहेत. विराट दुःखाने कोलमडलेल्या प्रेयसीच्या जीवनातील श्रध्दा अभंग स्वरूपाची आहे:

तरी अजूनही उभी
व्रतवेडी सोनकेळ
शीर्णविदीर्ण पानात
दवताजे रक्तफुल!
('व्रतवेडी'/रंगबावरी)

मनातील दाह आसवांच्या रूपाने व्यक्त करावा आणि ताण ढिला व्हावा असे कवयित्रीला वाटते:

... जी तुझ्याचसाठी आली अन् ओघळली
स्पर्शानि तुझिया फुलली, खुलली, हसली
ती अतां आसवे कुठं जाहली गुप्त
जी ढाळून व्हावे दग्ध चित्त हे शांत
('आसवे'/शेला)

प्रियकराशी संवाद करताना प्रेयसी सहजतेने उद्‌गारते, ''उभी राहून मी किती किती वेळ दृश्य पाहते. अंतःकरणात गोड भाव उसळतात. ते फक्त तुला कळतील''.... तिच्या अंतरीच्या अंतरात, हृदयाच्या गाभाऱ्यात जीवसख्याची नजर सतत शांत शांत तेवत असते. त्याच्या प्रेमाच्या अपार्थिव स्पर्शाने तिचे अंगांग मोहरून गेले आहे. 'अजूनीही' या भावनोत्कट कवितेत कवयित्री उद्‌गारते, अजूनही तुझा स्पर्श कायेवर आहे आणि अंगाचा सुगंध श्वासांवर खेळत आहे. अजूनही तुझे बोल कानात जसेच्या तसे आहेत. नयनातील भाव नीलारोहिणीत उभे आहेत. तू सर्वस्वी जरी विलगून राहिला आहेस. मी मात्र तुला दिवसेंदिवस विसरत चालले आहे.''

इंदिरा संतांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमांतून त्यांच्या अंतःकरणातील रंगतरंग प्रतिबिंबित होतात. अशा निसर्गप्रतिमा त्यांच्या कवितांतून जागोजागी विखुरलेल्या आहेत. प्रीती इतकेच त्यानी आपल्या भावजीवनात निसर्गालाही स्थान दिले आहे. आपले एकाकीपण जोपासले आहे.

... नव्हती जाणीव आणि कुणाची
नव्हते स्वप्नही कुणी असावें,
डोंगर चढणीवरी एकटें
किती फिरावे... उभे रहावे
('निवडुंगाच्या शीर्ण फुलाचे'/मेंदी)



अशा एकाकीपणाच्या सोहळ्यात त्याना निसर्ग साथसंगत करतो. अनेक अंगांनी, अनेक रूपकळांनी तो तिला भेटतो. निसर्ग विभ्रमांतून प्रियकराचा सहवास प्रेयसीला लाभतो. कधी विरहव्यथेचा दाह अंतर्विरोधी लयीतून व्यक्त होतो. कवयित्री म्हणते, ''जेव्हा मी अथांग आठवणींच्या डोहातून वर येते तेव्हा मी घुसमटलेली असते. पाणी निथळत असते. मी उशागतीला बसते. फक्त शुभ्र धुक्याच्या दवभिजल्या चार पाकळ्या दिसतात. हृदयातल्या दहा दिशांतून गंध धगधगत असतो.

रेखीव आणि निवांत रस्त्याच्या वाकणावर वृक्षांची दाट कमान असते. त्याच वाटेला पाऊल का वळते हे प्रेयसीला कळत नाही. प्रियकराची याद तिला लागलेली असते अन् ती उद्‌गारते :

नव्हे ते वाकण : दुधारी कट्यार
भेदिते अंतर आर पार
('कातरवेळेला'/शेला)

'अंतरावरून जाणारा अंधाराचा लोळ आणि त्याला न्याहाळणारी क्षीण दीपिकांची ओळ' 'एकतान आभाळ आणि बुजलेल्या खुणा कोरणाऱ्या चांदण्यांच्या टाचण्या' 'झिरीझिरी चांदण्याचा सहवास' 'हृदयाच्या काठावर टेकलेली चंद्रकोर हृदयात सदा ताजी असलेली चंद्रकोरीची जखम' आणि 'चंद्रकोरीतून उजळणारे चांदण्याचे रक्त' या प्रतिमांमधून प्रीतिविश्वातील आशा - निराशेच्या स्पंदनलयीचा सूक्ष्म आलेख आढळतो.

कधीकधी लाख लाख मोरपिसे रोमरोमांतून थयथयतात आणि गुंजेची धुंद माळ रक्तातून उलगडते.... सूर्योपासक पांगाऱ्यावर अंगाराचा प्रसाद फुलतो. तोच प्रेयसीच्या अंतःकरणातील दाहक अग्निफुलांचा सुवास जाणून घेतो. दुःखाच्या वेळी साथसंगत करतो... तिची पावले जरी धरणीवर असली तरी ज्ञात अथांग आकाशाला कवेत घेतात. सुकलेले ओठ नक्षत्रांचे दहिवर टिपून घेतात.... जेव्हा प्रेयसी प्रियकराकडे जाते तेव्हा सूर्य पाण्यात केशर टाकतो. झुलता सेतू रचतो. दिशा दाराशी अडखून केसामध्ये विजेची फुले गुंफतात. रात्र - चंद्रकळा नेसविते. चंद्र डोळ्यांत काजळ घालतो आणि पहाटे पहाटे चतुर उषाराणी मेणा पेऊन देते.

'तूं' या कवितेत प्रियकराशी संवाद करताना प्रेयसी उद्‌गारते : (मृगजळ)

कधी, दुष्ट तूं असा.... कोरसी
दवबिंदूवर अभाळनक्षी;
मातीच्या कधी ओंजळीत पण
लपसी येऊन.... जखमी पक्षी.

जेव्हा हरखून पहावे तेव्हा रात्र डोळ्यात उतरते. लाखो स्मृतींची टाचणी चांदणीविषात भिजते. क्षितिजाचे ओठ व्हावे अन् काही शब्द बोलावेत तर त्याना मौनाची जखम असते. त्यातून रक्त ठिबकत असते. (उभे मात्र थेंब रक्त/मृगजळ).

इंदिरा संतांच्या भावकवितेत पतीविरहाचे दुःख ही केंद्रवर्ती भावना आहे. पण हा भावनाशय विविध प्रतिमांच्या साहाय्याने उलगडत जातो. अनेकविध अनुभूतीचे कंगोरे नीटस शब्दांतून अभिव्यक्त करणे हा त्यांच्या प्रतिभेचा सहजधर्म आहे. वृत्त - जाति - राग यांचा स्वीकार न करता सरल भाव व्यक्त करणाऱ्या ओवीतून त्यानी काव्यरचना केली आहे. भावकवितेत जो भाव अभिव्यक्त होतो. त्याची ओळीओळींतून स्वतःचीच अशी लय निर्माण केलेली असते. ती अनोखी लय त्यांच्या भावकवितेत आढळते. समकालीन वाङ्मयीन संकेतांशी ही कविता नाते राखते. प्रसंगी पारंपारिक संकेतांचाही उपयोग करते. पण कवयित्री या सर्वांचे निराळेच रसायन निर्माण करते.

'मनाच्या अवकाशामधली मनोरथांची आतषबाजी', 'पाण्यावर मिटलेले लाल कळे', 'नक्षत्रांचे गुलाबपाणी', 'चंद्रास्ताची विव्हल शोभा', 'भावगंभीर पापणीची काळी मादक किनार', 'रसरशीत पाकळीवरल्या तांबुस नसा', 'सागराच्या भव्य रूपाची मोहिनी पडून सुधाकुंभ घेऊन, हरखून केव्हाची वाट पाहणारी सावळी कृशांगी उभी नारळी', 'नर्तन करणाऱ्या नाजुकपंखी परागकोमल संवेदना', 'प्रपातासारखा कोसळणारा टिंबांचा रंगीत ओहळ', 'आकाशाचा इवला आयत', 'अधांतरीच्या तारेवरती लटकणारे उराटे विदीर्ण वाघुळ', 'कुठे कुठे पाणथळींतील थरथर करणारे रंगीत पाणी', 'मनोमनाच्या कर्दळीवर चढणारा रंगीत बहर', 'चांदण्याची वाळू' 'ओल्या गवताचा गंध', 'स्वच्छ आरशीत खुलणारे कुसुंबी स्वप्न', 'चंद्रकरांचा झुलणारा झोत', 'ओल्या गर्द मातीवरचे जर्द पाकळ्यांचे मौन', 'तालात न मावणारा स्पर्शहिरव्या चुड्याचा नाद', 'खिडकीमधला वळजळी माड', 'चुकून कधींच्या मण्यामण्यांचा हिरवा पारा', 'उन्हाची मासोळी', 'अंगांगातून गजबज उठणारी लालविजेची नादपाखरे', 'मनच्या स्वप्नावर चढलेली रानमाळची हिरवी माया', 'दवाची मणिमाळ', 'दिनरातीच्या निष्पर्ण फांद्यावरून भरभर ठिपके देत चाललेली लवलव पालवी' व 'वड-पिंपळ - तळाशीं असलेले निश्चळ सावळें तळें' इ. प्रतिमांतून कवयित्रीच्या अंतःकरणात संवेदनाप्रवाहाची निर्माण झालेली चित्रे प्रत्ययास येतात.

कवयित्रीचे मन आत्मनिमग्न आहे. देवाने दिलेले सोनावळीच्या एकाकी फुलासारखे आभाळाखाली झुलणारे एकटेपण ती मनस्वीपणे जोपासते. या एकटेपणाच्या छटा व्यक्त करा[...] उलगडून दाखविताना ती उद्‌गारते:

हे एकटेपण. माझें. मीच माझ्या [...]
जमवलेलें. मनभर. कधी प्रसन्न [...]
दुपट्यावरील तान्ह्याच्या [...]
कधी रिकामें. असे रिकामे
वेड्या गाणसाच्या हसण्यासारखे
('तें एकटेपण'/[...])

कधी कधी तटस्थपणे कवयित्री [...] आत्ममनस्क वृत्तीने चिंतन करते:

माझें सुख, माझें दुःख
लाडके हे माझे भाव;
काय त्यांचेच कौतुक
कोठवरी त्यांना वाव
('एक [...]'/[...])

निसर्ग आणि आत्मनिष्ठ वृत्ती [...] एकतानता खालील ओळीत दिसून येते.

.... माळावर [...]
पाय ओले गवतात
कसे सांडते केशर
माझ्या मनाच्या पाण्यात.
('कुठेकुठे क्षितिजाशी'/बाहुल्या)

असेच भावमग्नतेचे पुढील ओळींतून [...] घडते:

....धरित्री धारा धारा
धारा नाचती अंगणात,
मन नाचतें नाचतें
जसा मोर अरण्यात
('घटगी'/बाहुल्या)

इंदिरा संतांच्या मनाच्या [...] पारदर्शक चित्र त्यांच्या [...] रेखाटले गेले. त्यांच्या आत्मनिष्ठ वृत्ती[...] अनेक छटा व्यक्त करणाऱ्या [...] ओळी पाहा :

मी म्हणजे ना, झिळमिळ तारा [...]
मी म्हणजे ना, कोसळणारी समुद्रांची [...]
मी म्हणजे तर प्रीतमाधुरी [...]
मी म्हणजे, तप्त विराणी [...]
अशीच होते, आणिक सदाकदा [...]
प्रसन्नदाहक वसुंधरेची मी तर इवली [...]
('[...]'/बाहुल्या)

इंदिरा संतांच्या कवितेत आंतरि[...] संघर्षाचे चित्र आढळते. ही कवि[...] मिताक्षरांतून फार मोठा आशय सूचक[...] व्यक्त करते. कवयित्री उद्‌गारते:

.... मी कधीच बुडून गेले आहे
'नाही' च्या महासागरात.
(तरंग/मृगजळ)

किंवा :

मीहि झाले थोडी ज्वाला;
झालें थोडीशी आभाळ;
थोडीशीच झाले राख :
उरलेंहि सगळं
('[...]'/मृगजळ)

स्वतःच्या कवितेविषयी अंत[...] मागोवा घेताना इंदिरा संत म्हणतात:

''[...] पालता माझी कवि[...] माझ्याबरोबर वाढली आहे. माझ्या दुः[...] रंगली आहे. दुःखानं कोसळली आ[...] प्रश्नानं अस्वस्थ झाली आ[...] माझ्याबरोबर तिलाही प्रौढपणा आ[...] आहे. (शेला/प्रस्तावना/पृ. २१).

आपल्या कवितांतून प्रीतिभावने[...] त्यानी अनन्यसाधारण महत्व दिलेले आ[...] त्यातील उत्कटतेमुळे ती वेदना केव[...] वैयक्तिक राहिलेली नसून ति[...] विश्वात्मकता लाभलेली आहे. प्रियकरा[...] सतत संवाद साधणारी व त्याच्या जीवन[...] एकात्म झालेली कवयित्री उद्‌गारते :

तुझीच ही निःश्वसितें;
मी तर वादळवेडी
('पदर उन्हाचा'/मृगजळ)

# एक अनासक्त कवियित्री

गेल्या पंचावन्न वर्षांच्या आमच्या कौटुंबिक सलोख्यात इंदिरा संत या थोर कवियित्रींना मला जवळून पाहता आले आहे. बेळगावच्या माझ्या आठ वर्षांच्या वास्तव्यात तर आमच्या गाठीभेटी जणू नित्याच्याच सहजसाध्य नव्हे. आता बेळगावच्या खानापूर रोडपासून वडगावपर्यंत इतके बंगले व कॉलेजे वाढली आहेत तशी तेव्हा नव्हती. जणू निर्मनुष्य माळरान पण त्याबाबत इंदिराबाईंनी कधी तक्रार केलेली आठवत नाही. अशीच एक दोन वर्षे बोललेल्या ऐकिवात नाही. कदाचित त्यांच्या समवयस्क मैत्रिणी - संजीवनी मराठे व शालिनी सोमण - यांच्याकडे काही बोलल्या असल्या तर न कळे ! पण नसावे. पण इंदिराबाईंचा स्वभाव आणि त्यांची अबोल अंतर्मुख वृत्ती पाहता त्यांनी

वृत्तपत्राला लोकशाहीचा तिसरा डोळा म्हणतात. असं वृत्तपत्र एक